| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५७०/२०२५ मधील नि.क्र.०१ वरील आदेश**<br>(आदेश पारीत दिनांक – १८.०३.२०२६)<br>**बालाजी व इतर वि. निरंक**<br>CNR No.MHLA060028322025 |

०१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी **बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम–१८२७ चे कलम २** अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदारांचे संक्षिप्त कथन असे की, इसम नामे **गणपतराव पि. शंकरराव वाघमारे** यांचा दिनांक ०२.०३.२०२५ रोजी मौजे भगवती मल्टीस्पेशॅलीटी हॉस्पीटल, नांदेडे येथे मृत्यू झाला आहे. (तद्नंतर **गणपतराव पि. शंकरराव वाघमारे** यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने **'मयत'** असे संबोधण्यात येईल). अर्जदार क्र.२ संगीता ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र.१ बालाजी व अर्जदार क्र.३ संगम हे मयताचे मुले आहेत. अर्जदारांनी मयताच्या मृत्यू पश्चात त्यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता अर्जदारांच्या नावे हस्तांतरण करणेकामी व इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०३. अर्जदारांच्या विनंतीस आक्षेप असल्याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदारांनी दिनांक २४.०१.२०२६ रोजी 'दैनिक रत्नापूर समाचार' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन **(निशाणी १६)** प्रसिध्द केले होते. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाले नाही.

०४. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार क्र.३ संगम पि. गणपत वाघमारे यांचे **(निशाणी १७)** अन्वये पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत

समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतूने त्यांच्या प्रतिज्ञापत्रातील कथने या ठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदारांनी उपनिबंधक (जन्म व मृत्यू), नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र **(निशाणी २१)** व वारसाचे प्रमाणपत्र **(निशाणी ०६)** वर दाखल केलेले आहेत. मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये मयत यांचा दिनांक ०२.०३.२०२५ रोजी भगवती मल्टीस्पेशॅलीटी हॉस्पीटल, नांदेडे येथे मृत्यू झाल्याचे दिसून येते. तसेच ते शिवणखेड खुर्द., ता.अहमदपूर, जि.लातूर येथील रहीवासी असल्याचे दिसून येते. तसेच वारस प्रमाणपत्राचे अवलोकन करता, उपरोक्त वारसदार हे मयत यांचे वारस असल्याचे दिसून येते. तद्नंतर अर्जदारांनी **(निशाणी १८)** अन्वये पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला.

**०५.** अर्जदार यांच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत यास केवळ अर्जदार हेच वारस असल्याचे ग्राह्य धरण्यास हरकत नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता, अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.**१ बालाजी पि. गणपत वाघमारे,** अर्जदार क्र.**२. संगीता भ्र. गणपत वाघमारे,** अर्जदार क्र.**३. संगम पि. गणपत वाघमारे** सर्व रा.शिवणखेड खुर्द, ता.अहमदपूर, जि.लातूर हे मयत **गणपतराव पि. शंकरराव वाघमारे** रा.शिवणखेड खुर्द, ता.अहमदपूर, जि.लातूर यांचे वारस असल्याचे घोषित करण्यात

येते.

३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.

४. अर्जदारांनी आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.03.20 11:05:04 +0530

**( स्वानंदी दे. वडगांवकर )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.

**स्थळ –** अहमदपूर.
**दिनांक –** १८.०३.२०२६.